आधुनिक भारतीय राजकीय विचार



संपादक
डॉ. संजय पाटील

आधुनिक भारतीय राजकीय विचार

■ डॉ. संजय काशिनाथ पाटील

■ प्रथम आवृत्ती – दि. १४ एप्रिल २०२२

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना

विलास पवार

सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी

सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN- 978-93-91305-69-7

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

अनुक्रमणिका

अ. क्र.	लेख — लेखक	पु.क्र.
1	मौलाना आझाद यांचे शिक्षण विषयक विचार व सद्यस्थिती **प्रा. डॉ. शुभांगी दिनेश राठी**	1
2	पंडित नेहरूंचे समाजवादाविषयीचे विचार **डॉ.संजय काशिनाथ पाटील**	11
3	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील भारतीय राज्यघटनेतील महिलांचे स्थान **डॉ. राजेंद्र सुभाष नाडेकर**	17
4	डॉ. आंबेडकरांचा सामाजिक न्याय आणि महिलांचे प्रश्न **प्रा.भालचंद्र देशमुख**	24
5	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार **प्रा.सौ.सुनीता भगवान पाटील**	32
6	जयप्रकाश नारायण यांची संपूर्ण क्रांतीविषयक विचार **डॉ. एस. एस. बिरंगणे**	38
7	महात्मा गांधी यांच्या विचाराची प्रासंगिकता **प्रा. डॉ. बी. जी. जोगदंड**	44
8	पंडीत जवाहरलाल नेहरूंचे लोकशाही विषयक विचार **प्रा. डॉ. शिल्पा अमृत बन्सोड**	52
9	मानवेन्द्रनाथ रॉय के नव–मानवतावाद पर विचार **डॉ. किशोर बी. वासनिक**	66
10	मानवेंद्रनाथ रॉय यांचे मुलगामी लोकशाही संबंधी विचार **प्रा. डॉ. अविनाश पांचाळ**	72
11	स्वामी विवेकानंद यांचे राजकीय विचार **प्रा.मनिषा म. किर्तने**	77
12	डॉ. बी आर. आंबेडकर आणि भारतीय लोकशाही **डॉ. कैलाश वि. बिसांद्रे**	82

13	मौलाना अबुल कलाम आझाद राजकीय विचार **प्रा. दिपाली त्रंबक देशमुख**	92
14	मानवी स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते – डॉ. बाबासाहेब आंबेडकर **प्रा.डॉ. वामन खोब्रागडे**	96
15	मानवेंद्रनाथ रॉय यांचे नव-मानवतावाद विषयक विचार **प्रा. निखिल गणेश जगताप**	103
16	डॉ. बाबासाहेब आंबेडकर **डॉ. प्रांजू रा. हिरेखन**	111
17	भूदान चळवळीचे प्रणेते – आचार्य विनोबा भावे **प्रा.डॉ.चांगुणा विठठल कदम**	127
18	स्वामी विवेकानंद : राष्ट्रवादी विचार **प्रा.डॉ.अनिता ज. तिडके**	132
19	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही : परिस्थिती व उपाय **डॉ. नागनाथ निवृत्ती तेलंगे**	137
20	मा. गांधीजीचे लोकशाहीभिमुख ग्रामस्वराज्य **निर्मळ बी.ए**	142
21	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लोकशाही संबंधीचे विचार **सहा. प्रा. दत्तात्रय देवन्ना कर्दपवार**	147

भूदान चळवळीचे प्रणेते – आचार्य विनोबा भावे

प्रा. डॉ. चांगुणा विठठल कदम
इतिहास विभाग, बी. डी. काळे महाविद्यालय घोडेगाव ता. आंबेगाव, जि.पुणे.,मोबाईल नं. ९५२७७९७६८६,ईमेल kadamcv .78@gmail.com

गोषवारा –

आचार्य विनोबा भावे यांची स्वातंत्र्योत्तर काळातील महत्वाची कामगिरी म्हणजे भूदान चळवळ होय. विनोबांनी भूदान चळवळीच्या माध्यमातून अहिंसात्मक मार्गाचा अवलंब करत एक प्रकारे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्रांती घडवून आणली. स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिल्याच दशकातील ही महत्वाची घटना होती. भूदान चळवळीच्या माध्यमातून आचार्य विनोबा भावे यांनी जमिनीच्या ग्रामीकरणाच्या पायावर गामोद्योगप्रधान अहिंसक समाजाची स्थापना केली. भूदान यज्ञाबरोबरच संपत्तीदान यज्ञही विनोबांनी सुरू केला. कारण त्यांच्या मते संपत्तीदानाशिवाय भूदान यज्ञ सफल होणार नाही. अशा प्रकारे भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांचे भूदान चळवळीतील योगदान प्रस्तुत शोधनिबंधात मांडण्यात आलेले आहे.

मुख्य षब्द –

आचार्य विनोबा भावे यांचा संक्षिप्त जीवन परिचय, भूदान चळवळीच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, भूदान चळवळीची वैशिष्टये, भूदान चळवळीचे स्वरूप व व्याप्ती, आचार्य विनोबा भावे यांचे भूदान चळवळीतील योगदान, भूदान चळवळीच्या यशापयशाची मीमांसा.

उद्दिष्टे –

१. भूदान चळवळीच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी विशद करणे.
२. भूदान चळवळीची वैशिष्टये नमूद करणे.
३.भूदान चळवळीचे स्वरूप व व्याप्ती अभ्यासणे.
४.भूदान चळवळीचे प्रणेते या नात्याने आचार्य विनोबा भावे भूदान चळवळीतील योगदान अभ्यासणे.
५.भूदान चळवळीच्या यशापयशाची मीमांसा करणे.

संशोधन पध्दती –

प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन करण्यासाठी संशोधन विषयासंदर्भात प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे माहिती संकलित करून ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर केलेला आहे.

प्रस्तावना –

थोर गांधीवादी आचार्य व भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे यांचा जन्म रायगड जिल्हयातील गागोदे या गावी ११ सप्टेंबर १८९५ रोजी झाला. विनोबांवर आपल्या आजोबांचा फार प्रभाव पडलेला होता. आपल्या आईची एकेक वचने त्यांनी आयुष्यभर तत्व म्हणून जोपासली. महात्मा गांधीजींच्या विचार व कार्याचा विनोबांवर फार प्रभाव पडलेला होता. म्हणूनच पुढे पहिले वैयक्तिक सत्याग्रही म्हणून महात्मा गांधींनी विनोबाजींची निवड केली.

गांधीजींच्या मृत्यूनंतर विनोबा भावे त्यांच्या ध्येयाचा प्रसार व प्रचार करीत राहिले. हया त्यांच्या श्रध्देचा नैसर्गिक परिणाम म्हणजे भूदान चळवळीचा उगम होय. गांधीजींच्या कोचरब आश्रमातूनच खऱ्या अर्थाने त्यांच्या राष्ट्रीय चळवळीच्या कार्याला सुरूवात झाली.

भूदान चळवळीच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी –

भूदान चळवळ ही सुधारणावादी चळवळ होती. युरोपियनांचा प्रभाव म्हणून भारतात सुध्दा विषमता निर्माण झाली होती. त्याचे प्रत्यंतर म्हणजे, " भारताची आर्थिक लूट करावी या उददेशाने प्रेरित झालेल्या कंपनी सरकारने जास्तीत जास्त महसूल पदरात पाडून घेण्याच्या हेतूने आपले महसूलविषयक धोरण निश्चित केले. हे धोरण सर्वत्र सारखे नव्हते. ते देशाच्या निरनिराळया भागात भिन्न स्वरूपाचे होते. तसेच परिस्थितीनुसार काही अंशी त्यात बदल होत गेले. या महसूल उत्पन्नाचा उपयोग शेतकऱ्यांच्या कल्याणाकरिता करण्यात आला नाही."[१]

१९५१ च्या सुमारास तेलंगणात जमिनीचा प्रश्न अतिभयंकर स्वरूपात व्यक्त झाला होता. साम्यवाद्यांनी जमीनदारांविरूध्द बंडे घडवून आणली होती. अनेक जमीनदारांना जीवे मारून त्यांच्या जमिनी गरीबांना वाटून देण्याचे सत्र सुरू केले होते. यावेळी सरकार सशस्त्र उपायांनी बंडाचा नायनाट करू पाहत होते. साम्यवादी व सरकार या उभयतांच्या अत्याचारात सामान्य जनता भरडून निघत होती. यावेळी हैद्राबादजवळच्या शिवरामपल्ली या गावी सर्वोदय समाजाचे तिसरे वार्षिक अधिवेशन भरले होते. या पार्श्वभूमीवर विनोबांनी भोवतालच्या परिस्थितीचे निरिक्षण करत त्या प्रांतात पदयात्रा करण्याचा निर्णय घेतला. विचाराचा प्रसार पदयात्रेणेच होऊ शकतो असा त्यांचा दृढविश्वास होता. विनोबांनी विचार केला, अशा तऱ्हेने पायी यात्रा करीत जमीन मिळवित गेलो तर जमिनीचा प्रश्न सुटेल. या कल्पनेतूनच जमीन मिळविण्याच्या कार्याला त्यांनी भूदान चळवळ असे नाव दिले. अशा प्रकारे भूदान चळवळीचा उदय झाला.

भूदान चळवळीबाबत विनोबा भावे म्हणतात की, " भूदान चळवळ ही क्रमशः होणारी क्रांती आहे. प्रथम विचारात नंतर शब्दात आणि शेवटी आचरणात असा त्या क्रांतीचा संकल्पित क्रम आहे."[२]. प्रथम हृदयपरिवर्तन, नंतर जीवन परिवर्तन, आणि

शेवटी समाजपरिवर्तन अशा क्रांतीच्या अवस्था विनोबांनी सांगितल्या आहेत. तेलंगणा, रशिया इत्यादी उदाहरणे देऊन विनोबा हे स्पष्ट करतात की, "हिंसेने ही समस्या सुटणारी नाही. सक्तीने जमिनी हिरावून घेण्यापेक्षा जमीनदारावर अपरिग्रहाचे संस्कार करणे श्रेयस्कर वाटते."[३]

भूदान चळवळीची वैशिष्टये –

भूदान चळवळीच्या माध्यमातून गरिबी नष्ट करून जमीनमालकाच्या हृदयात प्रेमाने परिवर्तन करून देशात नैतिक वातावरण निर्माण करणे यावर विनोबाजींचा भर होता. गरीब व श्रीमंत यामधील द्वेषभावना नाहीशी करून परस्परांबद्दल प्रेम व सद्भावना निर्माण करून देशात शांतता व सुरक्षिततेचे वातावरण निर्माण करणे वैशिष्टयपूर्ण होते. त्यातून विविध पक्ष एकत्र येऊन सहकार्याने व प्रेमभावनेने समाज विकासाचे कार्य घडवून आणतील यावर विनोबाजींचा विश्वास होता.

भूदान चळवळीचे स्वरूप व व्याप्ती –

भूदान चळवळीच्या स्वरूपाबाबत दादा धर्माधिकारी म्हणतात, "श्रीमंतांच्या दानामुळे मालकीची वाटणी होईल. परंतु मालकीच्या विसर्जनाची क्रांती गरीबांच्या दानातूनच होणे शक्य आहे. गरीबांच्या दानात क्रांतीचा बीजधर्म अंतर्भूत आहे. म्हणून अहिंसक क्रांतीच्या प्रक्रियेत गरीबांचे स्वामित्व विसर्जन ही एक मुलभूत वस्तू आहे."[४]

भूदान चळवळीचे स्वरूप व हेतू भूमिहीनांना जमीन मिळवून देण्यापुरते मर्यादित नव्हते तर विनोबांची अशी अपेक्षा होती की, जमीनमालकाने विचारपूर्वक व प्रेमाने जमीनीचे दान द्यावे. राजस वा तामस वृत्तीने जमीन देऊ नये. भूदान चळवळीच्या माध्यमातून केवळ जमिनीचे फेरवाटप न करता सर्वोदयाची वृत्ती जनतेत निर्माण व्हावी हा त्यांचा हेतू होता. विनोबांसाठी भूदान चळवळ ही केवळ एक संज्ञा नव्हती तर यज्ञप्रधान प्राचीन संस्कृतीचे ते आधुनिक रूप होते. शेकडो वर्षांपासून आर्थिक दुरावस्थेमुळे जमीन ही मूठभरांची मिरासदारी होऊन बसली आणि त्यातूनच समाजात विषमता निर्माण झाली. जमीनीची ही अन्याय्य व्यवस्था मोडून काढून प्रत्येक कसणाऱ्या भूमिहीनांना जमीन मिळवून देणे यासाठी त्यांनी भूदान अंगिकारले होते. देशातील जमीनदारांनी त्यांच्या जमीनीचा ६ वा हिस्सा भूमिहीनांसाठी दान करावा असे त्यांचे आवाहन होते.

भूदान शब्दात दान असा शब्दप्रयोग असला तरी तो सर्वसामान्य अर्थाने नाही. दान देणाऱ्याचे श्रेष्ठत्व व स्वीकारणाऱ्याचे गौणत्व त्यात अभिप्रेत नाही. दानं संविभागः म्हणजे, "सम्यक विभाजन अथवा योग्य वाटप. आपल्याजवळ जे असेल त्याचे योग्य वाटप करणे. हे वाटप करताना दात्याच्या हृदयाचे परिवर्तन होत असते. मनुष्याला प्राप्त होणाऱ्या प्रत्येक गोष्टीत समाजाचे सहाय्य असतेच, म्हणजे व्यक्ती समाजाची ऋणी असते."[५] तेलंगणा राज्यापासून सुरू झालेल्या भूदान चळवळीला विनोबांनी उत्तरप्रदेश,

बिहार, मध्यप्रदेश, ओरिसा, आंध्रप्रदेश तामिळनाडू, कर्नाटक, महाराष्ट्र इ. राज्यातून जमिनीचे दान मिळवत या चळवळीला व्यापक स्वरूप प्राप्त करून दिले.

आचार्य विनोबा भावे यांचे भूदान चळवळीतील योगदान –

विनोबा भावे यांनी तेलंगणा प्रांतातून जमीन मिळविण्यासाठी प्रारंभ केला. नंतर ७० दिवसात त्यांना एकूण १२ हजार एकर जमीन मिळाली. पुढे १४ वर्षे विनोबा भूदान मागत भारतभर पायी फिरले. जनतेने विनोबांना ४७ लाख एकर जमीन भूदानात दिली. भूदान चळवळीच्या निमित्ताने विनोबा सर्व तऱ्हेच्या भेदांचा व विषमतेचा अंत करू इच्छित होते. विनोबांची भूदान पदयात्रा म्हणजे जमीनदारांसमोर चाललेला प्रदीर्घ सत्याग्रहच होता.

१९५७ पासून विनोबांनी भूदान चळवळीच्या दुसऱ्या टप्प्यास सुरूवात केली. संपूर्ण भूमी ईश्वराची आहे. भूमी सर्वांची माता आहे, या भावनेतून जमिनीची मालकी विसर्जित करण्याचा सल्ला विनोबांनी दिला.

भूदान चळवळीचे यशापयश –

भूदान चळवळीला मिळालेला प्रतिसाद पाहता विनोबा भावे यांनी भारतभर अखंड पदभ्रमण करीत छोटे शेतकरी तसेच जमीनदारांचे हृदय परिवर्तन करून त्यांच्याकडून जमीन मिळविली. मिळालेली जमीन भूमिहीन शेतमजूरांना मोफत दिली. परिणामी जमीन घेणाऱ्यांच्या आर्थिक स्थितीत अल्पकाळात बदल घडून आला. विनोबा भावे यांची भूदान चळवळ भारतभर पसरली. भूदानाच्या या उपक्रमाची देशभर दखल घेण्यात आली. यासंदर्भात पं. नेहरू म्हणाले की, " शस्त्रांनी जो परिणाम झाला नव्हता तो विनोबाजींचे शब्द आणि कृती यातून विलक्षण सामर्थ्याने घडून आला . राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद म्हणतात की, हे काही भाकड जमिनीचे दान नव्हे. डॉ. राधाकृष्णन म्हणतात की, हे आपल्या राष्ट्राच्या श्रध्देचे प्रतिक मानता येईल. न्यूयार्क टाईम्सचा खास प्रतिनिधी रॉबर्ट ट्रंबल याने विनोबांना ' प्रेमाने लुटणारा आणि जमीन वाटणारा प्रतिपरमेश्वर' असे म्हटले आहे."[६]. भूदानात मिळालेल्या जमीनीपैकी २५ लाख ५५ हजार एकर जमीन सबंध भारतात आणि १ लाख १३ हजार एकर जमीन महाराष्ट्रात वितरीत झाली आहे.

आचार्य विनोबा भावे यांनी सुरू केलेल्या भूदान चळवळीला इतक्या मोठया प्रमाणात यश मिळालेले असले, तरी सरकारी पातळीवरील पाठिंब्याचा अभाव, नोकरशाहीची उदासीनता, प्राप्त जमीन व तिच्या वितरणातील अभाव, संघटनात्मक आधाराचा अभाव या कारणांमुळे त्यांचे कार्याला मर्यादित यश मिळाले.

निष्कर्ष –

१.आचार्य विनोबा भावे भूदान चळवळीचे प्रणेते म्हणून ओळखले जातात.

२.आचार्य विनोबा भावे यांची स्वातंत्र्योत्तर काळातील महत्वाची कामगिरी म्हणजे भूदान चळवळ होय.

३.विनोबांनी भूदान चळवळीच्या माध्यमातून अहिंसात्मक मार्गाचा अवलंब करत एक प्रकारे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक क्रांती घडवून आणली.

४.भूदान चळवळीच्या माध्यमातून ग्रामदानाच्या विकासास चालना मिळाली.

५.भूदानातून ग्रामदान या पध्दतीने संपूर्ण गावातील जमीनीचे ग्रामीकरण होत गेले.

संदर्भ टीपा –

१.सुमन वैद्य व शांता कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास, श्रीसाईनाथ प्रकाशन, नागपूर, तृतीयावृत्ती, जुलै २००४, पृ. २७६.

२.भा. ल. भोळे, आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, द्वितीयावृत्ती, २००३, पृ. ४९५.

३.कित्ता, पृ. ४९५.

४.वा. भा. पाटील, आधुनिक भारतीय राजकीय विचारवंत, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथमावृत्ती, २००९, पृ. ८५.

५.भा. ल. भोळे, पूर्वोक्त, पृ. ४९६.

६.गणेश राऊत, आचार्य विनोबा भावे, श्रीगंधर्ववेद प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०१०, पृ. १३७.

७.य. ना. देवधर, (अनु.), आजकालचा भारत, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे , प्रथमावृत्ती, २००६.

८.बी. एन सरदेसाई व व्ही. एन. नलावडे (संपा.), आधुनिक भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, २००४.